आधुनिक विचारांचे
# वर्तमान

बीड । मंगळवार, २४ ऑगस्ट २०२१ । वर्ष : ३ | आपले वृत्तपत्र, आपला आवाज | अंक : ४३ । पाने : ४ । मूल्य २ ₹

**अंतरंग**



पुन्हा धोक्याची घंटा

ग्लोबल तालिबानी टेन्शन

---

वाढदिवस विशेष

## गर्दीपेक्षा वेगळा पत्रकार



जागतिक कीर्तीचे व्याख्याते, विचारवंत शिव खेरा म्हणतात, जी माणसं यशस्वी झाली आहेत, ती वेगळं काहीच करत नाहीत, ते वेगळेपणाने काम करतात. असेच बीड जिल्ह्याच्या पत्रकारितेत भगीरथ तोडकरी या तरूण पत्रकाराने आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. गर्दीपेक्षा वेगळा पत्रकार, वेगळी मांडणी करणारा संपादक अशी भगीरथ तोडकरी यांची खासियत आहे. अपार मेहनत आणि प्रचंड धडपड या भांडवलाच्या जोरावरच भगीरथ यांची पत्रकारितेत वाटचाल सुरू आहे. माजलगाव सारख्या ग्रामीण भागात एक वृत्तपत्र वितरण करणारा मुलगा ते 'आधुनिक विचारांचे वर्तमान'चा संपादक असा प्रवास थक्क करणारा आहे, यात शंका नाही. वृत्तपत्रांच्या भाऊगर्दीत 'वर्तमान'चे वेगळेपण भगीरथ यांच्या वेगळेपणाने काम करणाऱ्या शैलीमुळे उठून दिसते. माझी आणि भगीरथ यांची उणीपुरी चार वर्षांची ओळख आहे. गोव्याच्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात भगीरथ यांची २०१७ साली प्रत्यक्ष भेट झाली. पहिल्या भेटीत या माणसाच्या प्रेमात पडावं असं वेगळेपण या पत्रकाराकडे आहे. माणसं जोडण्याची किमया आणि उत्कृष्ट संभाषण कौशल्य ही भगीरथ यांची बलस्थाने आहेत. किंबहुना याच जोरावर भगीरथ यांची पत्रकारिता वेगळेपण सिध्द करणारी ठरत आहे. बीडच्या पत्रकारितेत नव्या फळीतील जी बोटावर मोजण्याइतकी प्रतिभावंत पत्रकार आहेत, त्यात भगीरथ यांचे स्थान निश्चित वरचे आहे. पत्रकारितेत प्रत्येकजण अजीवन विद्यार्थी असतो. या भावनेतून भगीरथ प्रत्येक गोष्ट शिकत असतात. अशी जिज्ञासा अलिकडच्या काळात पत्रकारांमध्ये खूप कमी दिसून येते. प्रवास हा भगीरथ यांचा आवडता विषय त्यांनी गोव्याचा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव असो की नवी दिल्लीतील संसदीय अधिवेशन प्रत्येक गोष्ट शिकाऊ वृत्तीने प्रत्यक्ष हजेरी लावून अनुभवली आहेत. आज वर्तमान माध्यम समूह आपला दबदबा निर्माण करीत आहे, याचे श्रेय भगीरथ तोडकरी यांच्या कल्पकतेला दिले पाहीजे. 'मुँह मे शक्कर और पाँव मे चक्कर' या ओळीप्रमाणे जीवनाचा प्रवास करणाऱ्या भगीरथ तोडकरी नावाच्या पांथस्थाला येथून पुढील प्रवासासाठी उदंड शुभेच्छा!

**: बाबा श्रीहरी देशमाने**
(लेखक गोवा आणि महाराष्ट्रातील ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

---

# बीड जिल्हा ग्रीनझोनकडे

## दैनंदिन आढळणाऱ्या कोरोना रूग्णसंख्येत लक्षणीय घट

▶ प्रतिनिधी

बीड : जिल्ह्यातील कोरोना रूग्णसंख्येत लक्षणीय घट होत असून तालुकावार रूग्णसंख्या कमी होत असल्याने बीड जिल्ह्याची वाटचाल ग्रीनझोनकडे सुरू आहे.

सोमवार, दि.२३ ऑगस्ट रोजी ४ हजार १६४ संशयितांची कोरोना चाचणी करण्यात आली. यापैकी ४ हजार १०९ जणांचा अहवाल निगेटिव्ह आला, तर ५५ जणच बाधित आढळून आले. नव्या रूग्णांमध्ये अंबाजोगाई तालुक्यात ७, आष्टी तालुक्यात १०, धारूरमध्ये ४, गेवराईत १, केजमध्ये २, माजलगावात १, पाटोद्यात ३, शिरूरमध्ये २, वडवणीत ५, तर बीड शहर व तालुक्यात २० रूग्ण आढळून आले.

सोमवारी दिवसभरात १०३ जणांनी कोरोनावर मात केली. त्यांना रूग्णालयातून सुटी देण्यात आली आहे. दरम्यान, सोमवारी एक मृत्यूची नोंद आरोग्य विभागाच्या आयसीएमआर पोर्टलवर झाली. एकूण बाधितांची संख्या १ लाख ४८५ इतकी झाली असून, कोरोनामुक्त झालेल्यांची संख्या ९६ हजार ६६६ इतकी झाली आहे. आतापर्यंत २ हजार ६९४ जणांचा बळी गेला असून, सध्या १ हजार १२५ रूग्णांवर उपचार सुरू आहेत.

बीड जिल्ह्याचा डेथ रेट २.६८ टक्के आहे तर पॉझिटिव्ह रेट ११.३५ टक्के इतका आहे. रिकव्हरी रेट ९६.१९ टक्के इतका आहे. जिल्ह्यात जवळपास ५१३३ खाटांची व्यवस्था आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आली आहे. जिल्ह्यातील ९८ ठिकाणी कोरोना रूग्णांवर उपचार करण्याची व्यवस्था असून ४२५३ बेड सध्या शिल्लक आहेत. सोमवारी केवळ एकाचा कोरोनामुळे मृत्यू झाला आहे, आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीमध्ये दर दिवशी मृत्यूचा आकडा देणे वगळण्यात आला आहे.



### राज्यालाही मोठा दिलासा

मुंबई : राज्याला सोमवारी मोठा दिलासा मिळाला असून सोमवारी दैनंदिन रूग्णसंख्येत मोठी घट झाली आहे. त्याचप्रमाणे राज्यातील एकूण सक्रिय रुग्णसंख्याही ५० हजारांच्या खाली घसरली आहे. त्याचप्रमाणे रविवारच्या तुलनेत मृत्यूही घटले आहेत. सोमवारी दिवसभरात राज्यात १०५ रूग्णांचा मृत्यू झाला आहे. रविवारी ही संख्या १४५ इतकी होती. तसेच, सोमवारी बरे होणाऱ्या रूग्णाची संख्या ६ हजार ७९५ इतकी आहे. तर सोमवारी राज्यात एकूण ३ हजार ६४३ इतक्या नव्या रूग्णांचे निदान झाले आहे.

सोमवारी राज्यात झालेल्या १०५ रूग्णांच्या मृत्यूंनंतरही राज्याचा मृत्यूदर मात्र २.११ टक्क्यांवरच आहे. याबरोबर राज्यात आतापर्यंत एकूण ६२ लाख ३८ हजार ७९४ रुग्ण बरे झाले आहेत .

---

# बीड शिवसेनेला मिळाला धडाकेबाज जिल्हाप्रमुख

## एका दिवसात १४ शाखा स्थापनेचा विक्रम

▶ **विशेष प्रतिनिधी**



माजलगाव : शिवसेनेला अप्पासाहेब जाधव यांच्या रूपाने धडाकेबाज जिल्हाप्रमुख मिळाला असून एका दिवसात शिवसेनेच्या तब्बल १४ शाखा स्थापन करण्याचा विक्रम अप्पासाहेब जाधव यांच्या नावावर नोंद झाला आहे.

शिवसेनेचे नवे जिल्हाप्रमुख अप्पासाहेब कडाजीराव जाधव यांनी पदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर १२ ते २४ जुलै या कालावधीत शिवसंपर्क अभियान प्रभावीपणे राबवून जिल्ह्यात वेगळी छाप निर्माण केली. माजलगाव, वडवणी, किल्लेधारूर, केज, अंबाजोगाई आणि परळी वैजनाथ या सहा तालुक्यात महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसंपर्क मोहिम राबवून जनतेशी संवाद साधला. सहा तालुक्यातील पंचायत समिती गण आणि जिल्हा परिषद गटातील प्रत्येक गावांत भेट देवून शिवसेना जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव यांनी जनतेशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. सरकारने केलेल्या विविध विकास कामांची माहिती देण्यात आली. शिवसेनेचे बीड जिल्हाप्रमुख म्हणून अप्पासाहेब जाधव यांची वाटचाल धडाकेबाज सुरू आहे. संघटन आणि विकासात्मक कामे करत अप्पासाहेब जाधव यांनी जिल्ह्यात शिवसेनेला नवसंजीवनी दिली आहे. सहा तालुक्यात एकाच दिवसात शिवसेनेच्या तब्बल १४ शाखा स्थापन करून नवा विक्रम प्रस्थापित केला आहे.



### शिवसेना स्टाईलमुळे शेतकऱ्यांना मिळाले ऊस बिले

कळंब येथील शंभू महादेव साखर कारखान्याने शेतकऱ्यांची ऊस बीले तब्बल ५ महिन्यांपासून प्रलंबित ठेवली होती. शिवसेनेचे बीड जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव यांच्या कुशल नेतृत्वाखाली आंदोलन छेडण्यात आले. या आंदोलनाचे यश म्हणून शंभू महादेव साखर कारखान्याने तातडीने धनादेश काढले. आंदोलनातून पुढे आलेले नेतृत्व म्हणून अप्पासाहेब कडाजीराव जाधव यांच्याकडे पाहिले जाते. जनसामान्यांच्या प्रश्नासाठी आंदोलन उभारणारे जिल्हाप्रमुख म्हणून अप्पासाहेब जाधव यांची मराठवाड्यात वेगळी ओळख निर्माण होत आहे.




---

## डॉ.श्रीकांत शिंदे फाऊंडेशन सर्वदूर, सर्वव्यापी

# महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात पोहोचला आरोग्य यज्ञ

▶ **भगीरथ तोडकरी**



मुंबई : ठाणे येथील डॉ.श्रीकांत शिंदे फाऊंडेशनचे कार्य सर्वदूर पोहचले असून महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात फाऊंडेशनच्या वतीने मदत आरोग्य यज्ञ पोहोचला आहे. दरम्यान, पूरग्रस्तांच्या मदतीला धावून जात डॉ.श्रीकांत शिंदे फाऊंडेशनचे काम सर्वव्यापी बनत चाललेले आहे.

महाराष्ट्राच्या जडणघडणीत ज्या सामाजिक संस्थांचे मोठे योगदान लाभले आहे. त्यात डॉ.श्रीकांत शिंदे फाऊंडेशन अग्रेसर आहे. महाराष्ट्र राज्यातील कानाकोपऱ्यात हा आरोग्य यज्ञ पोहचून दुःखितांच्या, पिडीतांच्या मदतीला डॉ.श्रीकांत शिंदे फाऊंडेशनची टीम धावून जात आहे. स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून आणि आमदार रविंद्र फाटक यांच्या वाढदिवसानिमित्त ऱ्हदयाला छिद्र पडलेल्या ७० बालकांची मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली. आजपर्यंत तब्बल एक हजार बालकांच्या शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या आहेत. कोकण विभागातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील रूग्णांना हा लाभ देण्यात आला. कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ, जयसिंगपूर, कुरूंदवाड तर सांगली जिल्ह्यातील पलूस, भिलवडी भागात अंध बांधवांना मदतीचा हात दिला. सांगलीतील सावली बेघर, निराधार आश्रमात आरोग्य शिबीर घेण्यात आले. तसेच सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील पत्रकार बांधवांसाठी आरोग्य शिबीर घेण्यात आले. कोल्हापूर, चिपळूण, महाड पूरग्रस्त भागातील पत्रकारांना अन्नधान्य आणि प्रथमोपचार औषधी कीटचे वितरण करण्यात आले. कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील पूरग्रस्त भागात डॉ.श्रीकांत शिंदे फाऊंडेशनच्या वतीने ५० ठिकाणी आरोग्य शिबीरे घेण्यात आली. आजपर्यंत तब्बल ट्रकभर औषधांचा साठा पूरग्रस्त भागात रवाना करण्यात आलेला आहेत. पूरग्रस्त भागात ६ तज्ज्ञ डॉक्टर्स, डॉ.श्रीकांत शिंदे फाऊंडेशनची टीम, शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे १० सहाय्यक तब्बल २० पेक्षा जास्त दिवस अविरत सेवा देत होते. महाड येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकात दोन आठवडे आरोग्य शिबीरे घेवून गरजूंना मदतीचा हात दिला आहे. डॉ.श्रीकांत शिंदे फाऊंडेशनचे मार्गदर्शक तथो नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या कुशल नेतृत्वाखाली डॉ.श्रीकांत शिंदे फाऊंडेशन आणि शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष संयुक्तपणे आरोग्यसेवा बजावत आहे. शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाची टीम आणि कक्षप्रमुख मंगेश चिवटे २४ तास आरोग्य सेवेसाठी तत्पर आहेत. महाराष्ट्रात सर्वदूर डॉ.श्रीकांत शिंदे फाऊंडेशन पोहोचले असून या सर्वव्यापी कामाची नोंद घेतली जात आहे.

### प्रतिभावंत क्रीडापटूला ५ लाख रूपयांची मदत

रायगड जिल्ह्यातील केवणाळे, पोलादपूर पूरग्रस्त भागातील प्रतिभावंत क्रीडापटू साक्षी दाभेकरला पायाच्या शस्त्रक्रियेसाठी तब्बल ५ लाख रूपयांची मदत डॉ.श्रीकांत शिंदे फाऊंडेशनच्या वतीने नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते देण्यात आली. साक्षीची शस्त्रक्रिया मुंबई येथील केईएम हॉस्पीटलमध्ये करण्यात आली.



### पत्रकारितेतला सामाजिक चेहरा



मूळ पत्रकार असलेले मंगेश चिवटे शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाची धूरा यशस्वीपणे सांभाळत आहेत. डॉ.श्रीकांत शिंदे फाऊंडेशन आणि शिवसेना वैद्यकीय मदत कक्षातील दुवा म्हणून आज मंगेश चिवटे यांचे प्रभावी काम सुरू आहे. महाराष्ट्राच्या पत्रकारितेतील सामाजिक चेहरा म्हणून मंगेश चिवटे आरोग्य यज्ञातील एक सारथी म्हणून अविरत कार्य करत आहेत.

## संपादकीय

# पुन्हा धोक्याची घंटा

जागतिक तापमान वाढ हा सर्व जगासाठी चिंतेचा विषय बनत चालला आहे. किंबहुना पर्यावरण तज्ज्ञांच्या मते ही धोक्याची घंटा मानली पाहीजे. जागतिक हवामान बदलाच्या परिणामांमुळे शेतीसह अनेक क्षेत्रं संकटात आली आहेत. भूस्खलन, हिमनद्या वितळणं, महापूर येणं, कमी दिवसांमध्ये जास्त पाऊस होणं, जगात वणव्यांचं प्रमाण वाढून हजारो एकरातली वनं नष्ट होणं, काही भागात दुष्काळ पडणं, तापमानात वाढ होणं हे दृश्य परिणाम दिसतात; परंतु अनेक परिणाम असे आहेत, जे लक्षात येत नाहीत. आपल्यावरील आक्रमण निसर्ग अशा पद्धतीने परतवून लावत असल्याचं माणसाला कळत असलं तरी, अजून वळलेलं नाही. हवामान बदलाच्या विषयांमध्येही राजकारण सुरू असतं. औद्योगिकदृष्ट्या प्रगत असलेले देश हवामान बदलाला मोठ्या प्रमाणात जबाबदार असताना विकसनशील देशांवर जबाबदारी ढकलून मोकळे होतात. पॅरिस परिषदेत झालेले ठराव मान्य करण्यास अमेरिका सोयीस्करपणे नकार देते. आता तर हवामानावर होणाऱ्या परिणामांना मानवच जबाबदार' असल्याचं संयुक्त राष्ट्रांच्या शास्त्रज्ञांनी नुकत्याच सादर केलेल्या एका महत्त्वाच्या अहवालात म्हटलं आहे. युनोतर्फे असा अहवाल दर सात वर्षांनी प्रकाशित केला जात असतो. कार्बनसह अन्य वायूंचं वाढलेलं उत्सर्जन तापमान वाढीला जबाबदार आहे. ऑक्सिजनचं घटतं प्रमाण ही चिंताजनक बाब आहे. या पार्श्वभूमीवर वनीकरण, मृद आणि जलसंधारणावर पुरेसं लक्ष दिलं गेलेलं नाही. कागदोपत्री कामं झालेली दिसतात; परंतु परिस्थिती अधिक चिंताजनक होत चालली आहे. तापमान वाढ करणाऱ्या वायूंचं उत्सर्जन ज्या पद्धतीने सुरू आहे, ते पाहता अवघ्या दशकभरातच तापमान वाढीची मर्यादा ओलांडलेली असेल, असा इशारा हा अहवाल देतो. हा अहवाल म्हणजे येत्या काही महिन्यांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या वेगवेगळ्या अहवालांच्या साखळीची सुरुवात आहे. २०१३नंतर हा पहिला असा अहवाल आहे, ज्यात हवामान बदलाशी संबंधित विज्ञानाचं व्यापक विश्लेषण करण्यात आलं आहे. येत्या काही महिन्यांमध्ये ग्लासगोमध्ये होणाऱ्या हवामान बदलावरील शिखर परिषदेसाठी हा अहवाल अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. या अहवालाविषयी चिंता व्यक्त करताना संयुक्त राष्ट्र संघाचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरस म्हणाले की, आयपीपीसी वर्किंग ग्रुपचा हा पहिला अहवाल मानवतेसाठी धोक्याची घंटा आहे. मानवी हस्तक्षेपामुळे वातावरण, महासागर आणि जमीन यांच्या तापमानात वाढ झाली, हे नि:संदिग्धपणे सत्य आहे, असे या अहवालात अगदी स्पष्टपणे नमूद करण्यात आलं आहे. १९७०पासून तापमान वाढ वेगाने झाली आहे. अलीकडच्या काळात ग्रीस आणि उत्तर अमेरिकेत आलेल्या उष्णतेच्या झळा असोत किंवा जर्मनी आणि चीनमध्ये आलेले पूर; मानवी हस्तक्षेपामुळे याचं प्रमाण वाढलं आहे. १८५०-१९०० च्या तुलनेत २०११-२०२० या दशकात जागतिक पृष्ठभागाचं तापमान १.०९ अंश सेल्सिअस अधिक होतं. १८५० नंतरचा इतिहास तपासता गेली पाच वर्षे सर्वाधिक उष्ण होती. १९०१-१९७१ या काळाशी तुलना करता अलीकडच्या काळात समुद्रपातळी वाढण्याचा दर जवळपास तिप्पट झाला आहे. अंटार्टिकावरचा बर्फ वितळून तिथल्या समुद्राची पातळी कमी होण्यामागे मानवी हस्तक्षेप हे सर्वात मोठं कारण (नव्वद टक्के) असण्याची दाट शक्यता असल्याचं या अहवालात म्हटलं आहे. १९५०पासून उष्णतेच्या झळांची तीव्रता वाढली आहे, तर थंडी कमी झाली आहे. आजवरच्या तापमान वाढीमुळे आपल्या प्लॅनेटरी सपोर्ट सिस्टिममध्ये अनेक बदल झाले असून आणि पुढची अनेक शतकं ते सहस्त्रक त्यात पुन्हा बदल होऊ शकणार नाही. समुद्राची उष्णता वाढेल आणि ते अधिकाधिक आम्लयुक्त होतील. येणारी अनेक दशकं किंवा शतकं पर्वत आणि ध्रुवीय बर्फ वितळेल. यापुढे तापमानात होणाऱ्या छोट्या-छोट्या वाढीचेही गंभीर परिणाम होतील आणि हे नुकसान कधीच भरून निघणार नाही. या शतकाच्या अंतापर्यंत समुद्रपातळी दोन मीटरने, तर २१५० पर्यंत पाच मीटरने वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही, असा इशारा या अहवालात देण्यात आला आहे. समुद्रकिनारी राहणाऱ्या कोट्यवधी लोकांना २१००पर्यंत पुराचा धोका निर्माण होईल. मात्र हरितवायू उत्सर्जनात मोठी घट केल्यास वाढत्या तापमान वाढीला आळा घालता येऊ शकेल, अशी आशा शास्त्रज्ञ व्यक्त करतात. जगातल्या जवळपास प्रत्येक देशाने २०१५च्या पॅरिस हवामान करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत. या शतकाच्या शेवटपर्यंत जागतिक तापमान वाढ दोन अंश सेल्सिअसपेक्षा कमी ठेवणं, हा या कराराचा मुख्य उद्देश आहे; मात्र कार्बन उत्सर्जनात मोठी कपात न केल्यास हे लक्ष्य गाठणं अशक्य आहे. पुढच्या काही वर्षांमध्ये कार्बन उत्सर्जनात मोठी कपात केली नाही, तर २०४०च्या आधीही ही परिस्थिती ओढवू शकते. आयपीसीसीच्या २०१८च्या विशेष अहवालातही हा अंदाज व्यक्त करण्यात आला होता आणि आता नवीन अहवालानेही त्यावर शिक्कामोर्तब केलं आहे. आयपीसीसीने १९९२मध्ये हवामान बदलावरचा पहिला सर्वसमावेशक मूल्यांकन अहवाल सादर केला होता. नुकताच सादर झालेला अहवाल या संस्थेचा

# ग्लोबल तालिबानी टेन्शन

**२० वर्षानंतर पुन्हा एकदा अफगाणिस्तानवर तालिबानची सत्ता येतेय. अमेरिका आणि नाटो सैन्य तिथून बाहेर पडू लागलं तेव्हाच याची चाहूल लागली होती. तालिबाननं काबूलवर ताबा मिळवताच राष्ट्रपती अश्रफ गनी यांनी देश सोडला. हजारो नागरिक देशातून बाहेर पडतायत. लोकांना तालिबानच्या राजवटीची धास्ती वाटतेय त्याची कारणं त्यांच्या आधीच्या क्रूर राजवटीत आहेत.**

आज-काल

**अक्षय शारदा शरद**

आपण टेक्नॉलॉजीच्या जगात वावरत आहोत. काही हवं असेल तर अगदी सहजपणे आपल्यापर्यंत पोचण्याचा हा काळ आहे. कुठं फिरायचं म्हटलं तर गाडी काढायची. चारदोन मित्रांना सोबत घ्यायचं. लाँग ड्राईवला निघून जायचं. मस्त फटकायचं. हवं ते घालायचं. हवं ते खायचं. सगळा कसा मनमर्जी, मस्तमौला कारभार. इथपर्यंत सगळं ठीक. पण समजा तुम्हाला कुणी अमक्या तमक्या ठिकाणी जायचं नाही. आम्ही सांगू तेच करायचं. तसंच रहायचं. असं म्हटलं तर? मोकळ्या विचारांचे असू तर आपण अशा गोष्टींना थेट नकार देऊ. त्या व्यक्तीलाच उडवून लावू. पण समजा एखादा कायदा करूनच अशी बंधनं तुमच्यावर लादली गेली तर? विचार केला तरी काळजात धस्स होतं ना? त्यामुळेच अफगाणिस्तानवर तालिबानी सत्ता येणं तिथल्या लोकांना नकोय. ही सत्ता म्हणजे अफगाणी लोकांचा पुन्हा एकदा जाचक बंधनांच्या जगातला प्रवेश ठरणार आहे. बुरसटलेल्या धार्मिक परंपरा आणि पुरुषी अस्मितेच्या प्रतिष्ठेपायी आधीच तिथल्या महिला भरडल्या गेल्यात. त्याची सुरवात तालिबानच्या २० वर्षानंतरच्या एण्ट्रीने पुन्हा एकदा होतेय.

धार्मिक गटातून तालिबानचा उदय

तालिबान हा 'पश्तो' भाषेतला शब्द आहे. 'पश्तो' ही अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधल्या पठाण समुदायाची मुख्य भाषा. या भाषेत तालिबानचा अर्थ विद्यार्थी असा होतो. १९९० च्या दशकात उत्तर पाकिस्तानात तालिबानचा उदय झाला. इथल्या पश्तून लोकांचं आंदोलन म्हणून धार्मिक मदरशांमधे ते उभं राहिलं. तिथं कट्टर सुन्नी इस्लामचं शिक्षण दिलं जायचं. पण त्याची मुळं १९७० च्या दशकात सापडतात. याच वर्षी अफगाणिस्तानवर सोवियत युनियनने आपल्या कम्युनिस्ट राजवटीसाठी हल्ला केला होता. यात असंख्य लोक मारले गेले. त्यांच्याशी लढण्यासाठी स्थानिक लोकांची मुजाहिद्दीन नावानं एक फौज उभी राहिली. यात कंधारमधला 'तालिब' नावाचा एक धार्मिक गट होता. या गटात ओमर नावाचा तरुणही सहभागी झाला. त्यात या ओमरला आपला एक डोळा गमवावा लागला होता. पुढे ओमर एका मशिदीचा इमाम बनला. त्याचवेळी सोवियतशी दोन हात करण्यासाठी हा तालिब गट अधिक सक्रिय झाला. अमेरिका आणि पाकिस्तानकडून त्यांना रसद पुरवली जायची. त्यांना एका नेत्याची गरज होती. ओमरच्या रूपाने संघटनेला नवा नेता मिळाला. मुल्ला मुहम्मद ओमर.

शरिया कायद्याचं राज्य

१९८९ ला अफगाणिस्तानमधून सोवियत सैन्य माघारी गेलं. मोहम्मद नजीबुल्लाह अफगाणिस्तानचे नवे राष्ट्रपती झाले. १९९२ ला त्यांचं सरकार पडलं. नजीबुल्लाह यांनी संयुक्त राष्ट्रसंघाकडे मदत मागितली आणि त्याचवेळी तालिबाननं राजधानी काबूलवर हल्ला केला. यात नजीबुल्लाह यांची हत्या करण्यात आली. १९९६ ते २००१ पर्यंत अफगाणवर तालिबानचं राज्य होतं. १९९८ पर्यंत अफगाणिस्तानचा जवळपास



९० टक्के भाग तालिबाननं आपल्या ताब्यात घेतला. सुरवातीला तालिबाननं आपल्याला शांतता आणि सुरक्षा प्रस्थापित करायचीय असं म्हटलं होतं. पण सत्तेत येईपर्यंत ही भूमिका इस्लाममधल्या शरिया कायद्यानं राज्य करण्यापर्यंत पोचली. याकाळात कायद्याने चोरीसाठी हातपाय तोडणं, सार्वजनिक ठिकाणी फाशी देणं, महिलांनी बुरखा घालणं, मुलींना शाळा बंदी, पुरुषांनी दाढी वाढवणं अशा कठोर शिक्षा दिल्या आहेत जाऊ लागल्या. अलकायदा या दहशतवादी संघटनेनं ११ सप्टेंबर २००१ ला अमेरिकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवर हवाई हल्ला केला. त्याला प्रत्युत्तर म्हणून अमेरिकी सैन्यानं ७ ऑक्टोबर २००१ अफगाणिस्तानवर हल्ला केला. तालिबानला सत्तेतून पायउतार केलं. तिथं अमेरिका आणि इतर पश्चिमेकडच्या देशांचं जवळपास १ लाख ३० हजार इतकं सैन्य तैनात करण्यात आलं. या हल्ल्याचे मास्टरमाइंड असलेला ओसामा बिन लादेन आणि तालिबानचे संस्थापक मुल्ला ओमर मात्र पळून जाण्यात यशस्वी झाले.

सैन्य माघारीच्या वाटाघाटी

२००१ ला हामिद करजई अफगाणिस्तानचे नवे राष्ट्रपती झाले. पहिल्यांदा निवडणुका झाल्या. करजई निवडूनही आले. २००४ ते २०१४ ला त्यांनी राष्ट्रपती म्हणून अफगाणिस्तानवर राज्य केलं. २०१४ नंतर अमेरिकी सैन्य अफगाणमधून माघारी जायच्या चर्चा होऊ लागल्या. नॉर्थ अटलांटिक ट्रीटी ऑर्गनायझेशन अर्थात नाटो. जगातल्या २९ देशांचा सहभाग असलेल्या या लष्करी संघटनेचं सैन्यही अफगाणमधे होतं. नाटोचं नेतृत्व अमेरिका करत होती. या नाटोनं सुरक्षेची सगळी जबाबदारी अफगाण सैन्यावर टाकली. राष्ट्रपती अश्रफ गनी यांनी करार केला आणि हे सैन्य तिथून माघारी जायची प्रक्रिया सुरू झाली. २०२० मधे अमेरिका आणि तालिबानमधे एक ऐतिहासिक करार झाला. त्यातून गेली २० वर्ष बाहेरच्या देशांचं सैन्य तिथं असण्याला पूर्णविराम मिळाला. आणि या सैनिकांच्या माघारीचा मार्ग मोकळा झाला.

अशी मिळते आर्थिक रसद

अफगाणिस्तानमधे तालिबान सत्तेत आल्यावर सौदी अरेबिया, यूएई सोबत पाकिस्ताननं त्यांच्या सत्तेला पाठिंबा दिला होता. या देशांकडून तालिबानला रसद पुरवली गेली. अमेरिकी सैन्यानं तालिबानची सत्ता उघडून फेकल्यावर अनेक नेत्यांना पाकिस्ताननं क्वेटा भागात आश्रय दिल्याचं म्हटलं जातंय. पण त्याच तालिबान्यांनी २०१२-२०१३ मधे पाकिस्तानमधे ददहशतवादी कारवाया केल्या. मलाला युसूफजईवरच्या हल्ल्याची आठवण पूर्ण जगाला आहे. अफगाणमधेही सत्तेतून खाली खेचल्यावर तालिबान शांत राहीलं नाही. तिथं काहीना काही हिंसक घटना घडवत होतंच. २००१ नंतर या घटनांमधे वाढ झाली असल्याचं बीबीसीच्या एका लेखात



वाचायला मिळतं. त्यासाठी मोठ्या शहरांऐवजी तालिबाननं छोट्या भागांना आपलं लक्ष्य बनवलं. या कारवाईमुळे अमेरिकेच्या गुप्तचर संस्थेनं अफगाणिस्तानमधे सत्तेत येण्याची शक्यता आधीच वर्तवली होती. नाटोच्या म्हणण्यानुसार, तालिबानकडे जवळपास स्वतःचं असं ८५ हजार पेक्षा अधिक सैन्य आहे. शिवाय आर्थिक रसद पुरवण्यात रशिया, पाकिस्तान, सौदी अरेबिया हे देश आघाडीवर आहेत. ड्रग, धार्मिक दान, जबरदस्ती वसुलीचं धोरण हेसुद्धा तालिबानचे आर्थिक मार्ग आहेत. त्यामुळेच १५ ऑगस्टला काबुलवर नियंत्रण मिळवत तालिबानने पूर्ण अफगाणिस्तानचा ताबा मिळवला.

तालिबानचं स्वतंत्र मंत्रिमंडळही

तालिबानी संघटनेची एक कॅबिनेटही असते. यात वेगवेगळ्या खात्याचे असे १७ मंत्री असतात. अर्थ, सैन्य, गुप्तचर अशी खाती असतात. या संघटनेचं आंतरराष्ट्रीय कार्यालय कतारमधल्या दोहा इथं आहे. इथूनच तालिबानच्या कामकाजावर लक्ष ठेवलं जातं. तालिबानची स्वतःची एक न्यायव्यवस्था आहे. या व्यवस्थेवर लक्ष ठेवण्यासाठी एक न्यायाधीश असतो. सध्या याची जबाबदारी अब्दुल हकीम हक्कानी यांच्याकडे आहे. तसंच रहबरी शुरा नावाची एक सगळे निर्णय घेणारी तालिबानची सल्लागार समिती असते. यात २७ सदस्य असतात.

नेतृत्व करणारे ६ चेहरे

संघटना म्हटलं की त्याला नेता असतो. तसं नेतृत्व तालिबानकडेही आहे. हैबतुल्लाह अखुंदजादा हे तालिबानचे सर्वोच्च नेते आहेत. हैबतुल्लाह यांचा शब्द इथं अंतिम मानला जातो. त्याआधी मुल्लाह मंसूर अख्तर तालिबानचं नेतृत्व करत होते. पण २०१६ मधे अमेरिकन सैन्यानं केलेल्या एका ड्रोन हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाला. अखुंदजादा हे याआधी तालिबानचे न्यायाधीश राहिलेत. अमेरिकेसोबतच्या शांतता चर्चेत सहभागी मुल्ला अब्दुल गनी बरादर हे तालिबानच्या संस्थापकांपैकी एक आहेत.

बरादरही तालिबानमधलं मोठं प्रस्थ मानलं जातं. शेर मोहम्मद अब्बास स्तानिकजई गेली एक दशक कतारच्या दोहा इथं राहतायत. पाकिस्तानी सैन्य आणि आयसिस या दहशतवादी संघटनेकडून त्यांनी ट्रेनिंग घेतलंय. सिराजुद्दीन हक्कानी हे हक्कानी ग्रुपचे प्रमुख आहेत. हा हक्कानी ग्रुप तालिबानला आर्थिक आणि सैन्यविषयक रसद पुरवणं, त्याकडे लक्ष ठेवण्याचं काम करतो. मुल्ला मोहम्मद उमर तालिबानचे एक संस्थापक. मुल्ला मोहम्मद याकूब हा त्यांचा मुलगा. ३१ वर्षांच्या याकूबकडे तालिबानी सैन्याची जबाबदारी देण्यात आलीय. २०२० ला सैन्याचं प्रमुखपद त्याच्याकडे आलं. अब्दुल हकीम हक्कानी तालिबानच्या न्याय विभागाचे प्रमुख आहेत. सध्या त्यांच्याकडे शांतता चर्चेचं प्रमुखपद आहे. मागच्या वर्षी नोव्हेंबरमधे त्यांची अफगाणिस्तान शांतता चर्चेसाठी नियुक्ती करण्यात आली होती. २००१ पासून ते पाकिस्तानच्या क्वेटा इथं राहतायत. अशाप्रकारे तालिबानचं सध्याचं नेतृत्व या ६ चेहऱ्यांच्या हाती आहे.

# 'डेल्टा रोबोट' कोरोना पेशंटच्या सेवेत

**इंडोनेशियातल्या एका गावात राहणाऱ्या असियांतो यांनी एक रोबोट बनवलाय. त्याला 'डेल्टा रोबोट' असं नावंही त्यांनी दिलंय. इंडोनेशिया सध्या आशियातला कोरोनाचा हॉटस्पॉट बनलाय. अशावेळी आरोग्य यंत्रणेवरचा ताण वाढत असताना टाकाऊ वस्तूंपासून बनवलेला डेल्टा रोबोट घरपोच जेवण पोचवण्यासारखी कामं करतोय. त्यामुळेच कोरोना पेशंटसाठी तो वरदान ठरलाय.**

जिज्ञासा

**अक्षय शारदा शरद**

कचरा म्हटलं की, कित्ती काय आपल्या डोळ्यासमोर येतं. घरापासून अंगण, बाजारापर्यंत कित्येक ठिकाणं. कचऱ्याचे प्रकारही किती? त्यातही कितीक व्हरायटी असतात नाही? एक ना अनेक. त्यामुळेच कचरा आपल्या जगण्याचा भागच झालाय असं म्हटलं तर? चुकीचं नाहीच काही त्यात.

कचरा नेणाऱ्या गाड्या हल्ली अनेक ठिकाणी घरोघरी येतात. कचरेवाले आलेत असं आपण किती सहज म्हणून जातो? थेट आपल्या घरपोच येणाऱ्या सरकारलाही आपली कित्ती काळजीय. पण हा कचरा नेमका जातो कुठं? त्याच्या विल्हेवाटीचं काय? असे कित्येक प्रश्न मागे असतात ते असतातच! कचऱ्यातून खत निर्मितीसारख्या प्रक्रिया आपण ऐकून आहोतच. अशातच आता इंडोनेशियातल्या एका व्यक्तीला कचऱ्यातून रोबोट तयार करायची भन्नाट कल्पना सुचलीय. कोरोना पेशंट म्हटलं की, संसर्गाचा धोका होईल म्हणून त्याच्याशी चार हात लांब राहणं माणसं पसंत करतायत. अशात इंडोनेशियाच्या एका गावात कचऱ्यापासून बनलेला रोबोट कोरोना पेशंटच्या मदतीलाही धावून जातोय.

टाकाऊ वस्तूंपासून बनवलेला रोबोट

इंडोनेशियात सुराबाया नावाचं एक शहर आहे. सध्या या शहराला कोरोनाच्या दुसऱ्या लाटेनं आपल्या विळख्यात घेतलंय. याच सुराबायामधे टेम्बोक नावाचं गाव आहे. हे गाव तंत्रज्ञानातल्या वेगवेगळ्या रचनात्मक प्रयोगांसाठी म्हणून ओळखलं जातं. सध्या एका रोबोटमुळे हे गाव






चर्चेत आलंय.

याच गावातल्या असियांतो या ५३ वर्षांच्या व्यक्तीने आपल्या टीमच्या मदतीने रोबोट बनवलाय. त्यासाठी त्यांनी घरातलं टाकाऊ सामान, जुन्या टीवीतले मॉनिटर अशा वस्तूंचा वापर केलाय. या रोबोटचं बारसं करून त्यांनी त्याला 'डेल्टा रेबोट' असं नावंही दिलंय. सध्या टेम्बोकमधल्या अनेक गल्लूयांमधे कोरोनामुळे लोक घरीच विलगीकरणात आहेत. रोबोट आपण स्पीकरने त्यांच्यापर्यंत जेवण आल्याचा मॅसेज पोचवतो. या डेल्टा रोबोटचं डोकं घरच्या कुकरनं बनवलंय. त्यात एक बॅटरी बसवण्यात आलीय. ही बॅटरी १२ तास चालते. रोबोटच्या हालचालींसाठी म्हणून यात रिमोटचा वापर करण्यात आलाय.

कमी खर्चिक, कोरोनात वरदानही

इंडोनेशिया सध्या कोरोना वायरसचं आशियातलं नवं केंद्र बनलंय. या देशातल्या कोरोना पेशंटचा आकडा ३६ लाखाच्या पार गेलाय. तर मृत्यूचा आकडाही १ लाखाच्या पलीकडे गेलाय. अशा स्थितीत आरोग्य यंत्रणांवरचा ताण प्रचंड आहे. जपानसारख्या देशांमधे रोबोटचा वापर केला जातोय. सध्याच्या साथरोगाच्या काळात हे रोबोट मदतीसाठी म्हणून वरदान ठरतायत. ते बनवायचे तर त्यासाठी तंत्रज्ञान आणि खर्चिक कामही आहे. अशावेळी इंडोनेशियातल्या एका गावात टाकाऊ वस्तूंपासून बनवलेला हा रोबोट फार महत्वाचाय. सध्या जग कोरोनाच्या कात्रीत असताना असे यंत्र मानव माणसाच्या दिमतीला येणं, त्यांचा वापरही एकप्रकारे आशेचा किरण म्हणायला हवाय. त्यामुळेच मनोरंजनासाठी म्हणून रोबोट तयार करताना त्याचा विधायक कामासाठीही वापर होऊ शकतो.

रोबोट बनवण्यामागची भूमिका

इंडोनेशियातल्या असियांतो व्यक्तीला या रोबोटची कल्पना सुचलीय. पण त्यामागची त्यांची भूमिका फार महत्वाची आहे. कोरोनाच्या वाढत्या पेशंटचा विचार करून आपल्या सार्वजनिक सेवांमधे हा रोबोट मदत करू शकेल असं त्यांना वाटतंय. यासंबंधी माहिती देणारी रॉयटर या जगप्रसिद्ध न्यूज एजन्सीला त्यांची एक छोटेखानी प्रतिक्रिया आलीय. हा रोबोट अगदीच सर्वसामान्य असल्याचं असियांतो यांचं म्हणणं आहे. तसंच तो घरगुती टाकाऊ वस्तूंपासून बनवल्यामुळे त्यांचाही योग्य ठिकाणी पुनर्वापर होत असल्याचं त्यांनी म्हटलंय. आपल्याकडे कोरोना झाल्यावर घर, ठिकाण सॅनिटाईज केलं जातं. औषधं फवारणी केली जाते. तिथंही हा रोबोट काम करेल. असं त्यांनी रॉयटरला सांगितलंय.

# जनसामान्यांना दर्जेदार आरोग्यसेवा देवू

## आमदार प्रकाश सोळंके यांची ग्वाही; रत्नसुंदर मेमोरियल हॉस्पिटलचे भूमिपूजन

प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यातील सामान्य रूग्णांना माफक दरात दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठीच रत्नसुंदर मेमोरियल हॉस्पिटलची निर्मिती होत आहे, असे प्रतिपादन माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी व्यक्त केले. ते रत्नसुंदर मेमोरियल हॉस्पिटलच्या भूमिपूजन समारंभात बोलत होते.





सध्या धकाधकीच्या काळात माणसाला कोणतेही आजार होऊ लागले आहेत. ऱ्हदयविकार, हाडांचे, मणक्याचे, किडनीचे आजार यासाठी रूग्णांना उपचारासाठी मोठा आर्थिक खर्च करून बाहेरगावी जावे लागते. हे खर्च वाचवण्यासाठी आणि सर्वसामान्य माणसाला कमी खर्चात दर्जेदार आरोग्य सुविधा व उपचारासाठी रत्नसुंदर मेमोरियल हॉस्पिटलची उभारणी होणार आहे. हे काम एक वर्षात पूर्ण करणार असल्याचे मतही आमदार प्रकाश सोळंके यांनी व्यक्त केले. माजलगाव विकास प्रतिष्ठान संचलित रत्नसुंदर मेमोरियल हॉस्पिटलचे भूमिपूजन बुधवार, दि.१८ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता ह.भ.प.एकनाथ महाराज माने यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार डी.के.देशमुख होते, तर माजी आमदार मोहनराव सोळंके, माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील, नगराध्यक्ष शेख मंजूर, डॉ.शिवाजी सुक्रे, डॉ.सुरेश साबळे, बाबुराव पोटभरे, डॉ.बालाजी जाधव, सभापती अशोकराव डक, डॉ.प्रकाश आनंदगावकर, डॉ.रामप्रसाद बजाज, खुर्शिद नाईक, माधवराव निर्मळ, दयानंद स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती. आमदार सोळंके पुढे म्हणाले की, सर्वसामान्य माणसाच्या आर्थिक विकासासाठी सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी आमच्या पालकांनी काम केलेले आहे. सर्वसामान्य माणसाला कमी खर्चात दर्जेदार उपचार मिळावेत, अशी त्यांची इच्छा होती. यासाठी एक हॉस्पिटल उभारावे म्हणून रत्नसुंदर मेमोरियल हॉस्पिटलची उभारणी करण्यात येत असल्याचे सांगितले. अधिष्ठाता डॉ.शिवाजी सुक्रे म्हणाले, सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून सुसज्ज हॉस्पिटल होत आहे. आणखी चांगल्या सुविधा देण्यासाठी आमदार सोळंके यांनी या ठिकाणी मेडिकल कॉलेज उभारावे. त्यासाठी सर्व प्रकारचे सहकार्य करणार असल्याचा विश्वास दिला. अध्यक्षीय समारोपप्रसंगी देशमुख म्हणाले, मतदारसंघाच्या विकासासाठी दिवंगत सुंदररावजी सोळंके यांनी अतुल्य राजकीय योगदान दिले. त्यांच्यामुळे माजलगाव धरण झाल्याचे सांगत माझ्या शाळेला जागा मिळून दिली. तसेच मतदारसंघाच्या विकासासाठी सोळंके परिवाराचे मोठे योगदान असल्याचेही त्यांनी सांगितले. या वेळी माजी आमदार मोहनराव सोळंके, माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील, डॉ.प्रकाश आनंदगावकर, ह.भ.प.एकनाथ महाराज माने, बाबुराव पोटभरे, मुंबई बाजार समितीचे सभापती अशोक डक, डॉ.सुरेश साबळे याची समयोचित भाषणे झाली. सूत्रसंचालन सखाराम जोशी यांनी केले, तर आभार धैर्यशील सोळंके यांनी मानले.

## धारूरमध्ये डेंग्यूमुळे इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्याचा मृत्यू

प्रतिनिधी

धारूर : अभियांत्रिकीचे दुसऱ्या वर्षात शिक्षण घेणाऱ्या एका विद्यार्थ्याचा डेंग्यूमुळे उपचारादरम्यान मृत्यू झाला. ओम जगताप असे विद्यार्थ्याचे नाव आहे. त्याच्यावर अंबाजोगाई येथील रूग्णालयात उपचार सुरु होते. जगताप कुटूंबियांवर ओढावलेल्या या दुर्दैवी प्रसंगामुळे शहरात हळहळ व्यक्त होत आहे.

धारूर शहरात गेल्या काही दिवसांपासून डेंग्यू आजाराची साथ सुरु आहे. कसबा विभागात डेंग्यूचे रूग्ण आढळण्याचे प्रमाण अधिक आहे. या भागातील नागरिकांनी अनेक वेळा प्रशासनाला याची माहिती दिली आहे. डेंग्यूमुळे यापूर्वीही या भागात मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत.



महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीतील ऑपरेटर बाबासाहेब ऊर्फ नाना जगताप याच भागात राहतात. अभियांत्रिकीचे शिक्षण घेणारा त्यांचा मुलगा ओम याला मंगळवारी डेंग्यूची लागण झाल्याचे निष्पन्न झाले. शहरातील खाजगी रूग्णालयात उपचार घेत असताना त्याची प्रकृती खालावली. अधिक उपचारासाठी त्याला अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण रूग्णालयात हलवण्यात आले. मात्र, उपचार सुरू असताना गुरुवारी रात्री ११ वाजेच्या सुमारास त्याची प्राणज्योत मावळली. ओम पत्रकार सुर्यकांत जगताप यांचा पुतण्या होत. अतिशय शिस्तप्रिय, अभ्यासू, शांत व संयमी स्वभावामुळे ओमची वेगळी ओळख होती. शुक्रवारी धारूर येथील स्मशानभूमीत त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या अकाली निधनामुळे दुःख व्यक्त होत आहे.



### माजलगावात शिबिराला मोठा प्रतिसाद

## ५० रक्तदात्यांनी केले रक्तदान

प्रतिनिधी

माजलगाव : श्री शिवशंभू चॅरिटेबल ट्रस्ट महाराष्ट्र राज्य आणि प्रभू श्रीरामचंद्र सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्य दिनानिमित्त रविवार, दिनांक १५ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते सायं. ४ वाजेदरम्यान रक्तदान शिबिर झाले. दरम्यान, या रक्तदान शिबिरात ५० रक्तदात्यांनी सहभाग घेतला. या शिबिरात सहभागी रक्तदात्यांना ब्लूटुथ हेडफोन भेट देण्यात आले.

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन शिवसेना बीड जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव यांनी केले. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तालुका कार्यवाह जगदिश साखरे, शिवसेना तालुका उपप्रमुख अतुल उगले, दासू पाटील बादाडे, शिवाजीराव चव्हाण, सुखदेव धुमाळ, पत्रकार बालासाहेब फपाळ, भगीरथ तोडकरी आदींची उपस्थिती होती. या शिबिराचे आयोजन प्रभू श्रीरामचंद्र सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष किशोर कानडे यांनी केले. या रक्तदान शिबिरात ५० रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. हे रक्तदान शिबिर जुना मोंढा येथील श्री गणपती मंदिरात झाले. रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी विक्रम शिंदे, सुखदेव धारक, सुरेश जाधव, शशिकांत आमनर, रोहीत धारक आदींनी परिश्रम घेतले.

### यशवंत हॉस्पिटलची सामाजिक बांधिलकी

## नगरपालिका कर्मचारी विलेश कांबळे यांना आर्थिक मदत

प्रतिनिधी

माजलगाव : येथील नगर पालिकेचे कोरोना मृत रूग्णांचे अंत्यसंस्कार करणारे कर्मचारी विलेश कांबळे यांना म्युकरमायकोसिस झाल्याने त्यांना डॉ.यशवंत राजेभोसले यांच्या वतीने उपचारासाठी आर्थिक मदत करण्यात आली.

तालुक्यातील १८० पेक्षा जास्त कोविड-१९ मृतांचे अंत्यविधी करणारे नगर परिषद कर्मचारी, माजलगावचे कोरोना योद्धे विलेश महादेव कांबळे यांना म्युकरमायकोसिस आजाराची लागण झाली असल्याने त्यांना मागील तीन महिन्यात ४ वेळा ऑपरेशन झाले.

त्यांना पुढील उपचारासाठी पुणे येथील हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आलेले आहे. त्यामुळे त्यांना माजलगावचे डॉ.यशवंत राजेभोसले यांनी पंचवीस हजाराची आर्थिक मदत केली. त्यावेळी उपस्थित औरंगाबाद येथील हेडगेवार हॉस्पिटलचे डॉ.श्रीकांत देशमुख, शिवहर शेटे, संकेत साळवे, विलेश कांबळे यांचे भाऊ निलेश कांबळे आदी उपस्थित होते.





माजलगाव : सांडस चिंचोली येथे नितीन नाईकनवरे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी नारायण पाटील, सचिन कदम, माऊली कदम, दयानंद शेजुळ, बाळु कदम, अमोल शेजुळ, कालिदास शेजुळ, धनंजय गिरी, बादाडे.

## पिकविमा प्रश्नी आयुक्तालयावर धडक मोर्चा

प्रतिनिधी

माजलगाव : बीड जिल्ह्यातील सन २०२० च्या खरीप विमा प्रश्नी दि. ३० ऑगस्ट रोजी पुणे येथील राज्य कृषी आयुक्तालयावर अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने शेतकऱ्यांचा धडक मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. अखिल भारतीय किसान सभेच्या बीड जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची महत्वपूर्ण बैठक नित्रूड येथे पार पडली.

सन २०२० चा खरीप पिक विमा मंजूर व्हावा म्हणून बीड जिल्हा किसान सभेच्या वतीने गेल्या महिनाभरापासून आंदोलन सुरू आहे. यात गावा गावात जाऊन शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करीत आहेत. तसेच बीड जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी आमदार आणि खासदार यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले आहे. विमा प्रश्नी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकऱ्यांचे शेतकऱ्यांची निदर्शने देखील झाले आहेत. यावेळी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी किसान सभेच्या शिष्टमंडळासोबत चर्चा करून शेतकऱ्यांची मागणी योग्य असल्याचे म्हटले होते. विमा प्रश्नांवर शेतकऱ्यांचा किसान सभेला पाठिंबा मिळत आहे. विमा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आता शेतकऱ्यांचे आंदोलन पुणे येथील राज्य कृषी आयुक्त कार्यालयावर धडकणार असून यात हजारो शेतकरी भाग घेणार असल्याचे विमा आंदोलनाचे नेते कॉ.अजय बुरांडे यांनी सांगितले आहे. यावेळी किसान सभेचे पी.एस.घाडगे, दत्ता डाके, मुरलीधर नागरगोजे, मोहन लांब, संदिपान तेलगड, मुसद्दिक बाबा, बालाजी कडबाने उपस्थित होते.

## दांडीबहाद्दर कर्मचाऱ्यांचा डॉ.साबळेंकडून 'पंचनामा'

### तालखेड रूग्णालयातील गैरहजेरी प्रकरणी वेतन कपात

प्रतिनिधी



माजलगाव : सर्वसामान्यांच्या आरोग्यसेवेसाठी नियुक्त केलेल्या शासकीय डॉक्टर, कर्मचाऱ्यांच्या कामावर जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुरेश साबळे यांनी लक्ष केंद्रित केले आहे. तालखेड ग्रामीण रूग्णालयाला त्यांनी गुरूवारी भेट दिल्यानंतर अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या गैरहजेरीसह कामकाजात मोठ्या प्रमाणात अनियमितता आढळून आली. यामुळे डॉ.साबळे यांनी वैद्यकीय अधीक्षकांसह कर्मचाऱ्यांचा एक दिवसाचा पगार कपात करण्याची कारवाई करत कारणे दाखवा नोटिसाही बजावल्या आहेत. दरम्यान, डॉ.सुरेश साबळे यांनी तालखेड ग्रामीण रूग्णालयातील दांडी कर्मचाऱ्यांचा चांगलाच 'पंचनामा' केला. या कारवाईमुळे इतर कामचुकारांचे धाबे दणाणले आहेत.



सर्वसामान्यांच्या आरोग्यासाठी शासन मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून आरोग्यसेवा पुरवत आहे. असे असताना शासकीय रूग्णालयातील डॉक्टर, कर्मचारी मात्र हजेरी लावण्याचे काम करीत असल्याचे चित्र जिल्हाभरात दिसून येत आहे. जिल्ह्यातील नागरिकांना शासकीय आरोग्यसेवा तत्पर मिळावी यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुरेश साबळे यांनी अधिकारी, कर्मचाऱ्यांना सक्त आदेश देत कामात हलगर्जीपणा करणाऱ्यांवर थेट कारवाईचा बडगा उगारण्यात येत आहे. बुधवारी लसीकरणासाठी जिल्हा रूग्णालयात नागरिकांच्या रांगा लागल्या असताना गैरहजर राहणाऱ्या दोन तंत्रज्ञांना थेट कार्यमुक्त करण्याची कारवाई त्यांनी केली होती. डॉ.साबळे यांनी गुरूवारी सायंकाळी तालखेड ग्रामीण रूग्णालयाला भेट देऊन रूग्णालयातील कामकाजाचे थेट पोस्टमार्टम केले. भेटी दरम्यान वैद्यकीय अधीक्षकांसह वैद्यकीय अधिकारी गैरहजर असताना कामकाजातही मोठ्या प्रमाणात अनियमितता आढळून आली. यामुळे डॉ.साबळे यांनी अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांचा एक दिवसाचा पगार कपात करत सर्वांना कारणे दाखवा नोटिसा बजावल्या आहेत. या कारवाईमुळे दांडीबहादरांना मोठी चपराक बसली आहे. बीड जिल्ह्यातील शासकीय रूग्णालयात नागरिकांना वेळेवर आरोग्यसेवा मिळणे आवश्यकच आहे. या कामात हलगर्जी करणाऱ्यांची गय न करता थेट कारवाई करण्यात येईल, असे डॉ.सुरेश साबळे यांनी सांगितले. तालखेड ग्रामीण रूग्णालयातील अधिकारी, कर्मचारी मुख्यालयी न राहता अपडाऊन करतात. विनापरवानगी गैरहजर राहतात. रूग्णालयात कोणतेही लसीकरण करण्यात येत नाही. प्रसूतीसाठी आलेल्या रूग्णांवर उपचार करण्याऐवजी त्यांना इतरत्र रेफर केले जाते. कोरोना चाचण्या पुरेशा प्रमाण होत नाहीत. रूग्णालयातील नोंदी अद्ययावत नाहीत, बाह्यरूग्ण, आंतररूग्ण शुल्काबाबत शासकीय मार्गदर्शक सूचनानुसार कार्यवाही नाही.

### तालखेड ग्रामीण रूग्णालयाला गतवैभव प्राप्त करून द्या : गुलाब मोरे



तालखेड ग्रामीण रूग्णालयाअंतर्गत जवळपास १० गावे आणि १५ तांडे आहेत. त्यामुळे जनसामान्य लोकांच्या आरोग्याचा प्रश्न तालखेड ग्रामीण रूग्णालयाशी आहे. मात्र येथे येणारे अधिकारी, कर्मचारी कामचुकारपणा करत असल्याने रूग्णांची गैरसोय होत आहे.या प्रश्नी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुरेश साबळे यांनी कामचुकारांना वठणीवर आणून या रूग्णालयाल गतवैभव प्राप्त करून द्यावे, अशी अपेक्षा स्थानिक सामाजिक कार्यकर्ते गुलाब मोरे यांनी वर्तमानशी बोलताना व्यक्त केली.

## शॉक लागून कामगाराचा मृत्यू

### कुटुंबियांना तात्काळ मदत द्या : काँग्रेस

प्रतिनिधी

माजलगाव : येथील धारूर रोडवर असलेल्या नाईक टॉवरच्या बाजूला सुरू असलेल्या बांधकामासाठीचे गज कट करीत असताना कटर मशीनचा शॉक लागून अल्ताफ अखिल शेख (वय ३५) या युवकाचा मृत्यू झाल्याची घटना शनिवारी सकाळी ११ वाजण्याच्या दरम्यान घडली. दरम्यान, शेख कुटुंबियांना सावरण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज असून कामगार महामंडळाने तात्काळ मदत द्यावी असे मागणी काँग्रेसचे शहराध्यक्ष शेख रशिद यांनी पत्रकाव्दारे केली आहे.



शहरातील धारूर रोड येथील नाईक टॉवरच्या बाजूला खाजगी बांधकाम सुरू आहे. या बांधकामासाठी गज कापण्याचे काम मयत युवक अल्ताफ अखिल शेख हा करीत होता. त्यासाठी असलेले कटर मशीनचे वायर लीक झाल्याची बाब अल्ताफ याच्या लक्षात आली नाही. त्यामुळे मशीनमध्ये करंट उतरला व त्यास जबर शॉक बसला. यानंतर त्यास तात्काळ आजूबाजूला असलेल्या लोकांनी दवाखान्यात नेले त्या ठिकाणी डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले. अवघ्या ३५ वर्षाच्या अल्ताफ यांचा असा दुर्दैवी मृत्यू झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत होती.

वर्तमान
www.vartmannews.in
या वेबसाईटला भेट द्या !

AUGUST 25



बीड जिल्ह्याच्या पत्रकारितेत वेगळा ठसा उमटविणारे
वर्तमान माध्यम समुहाचे सर्वेसर्वा प्रतिभावंत पत्रकार

# भगीरथ तोडकरी

यांना दीर्घायुष्य लाभो या वाढदिवसाच्या
**कोटी कोटी शुभकामना !**

शुभेच्छुक

आधुनिक विचारांचे वर्तमान
आपले वृत्तपत्र, आपला आवाज

वर्तमान फाऊंडेशन

वर्तमान पब्लिकेशन

वर्तमान प्रतिबिंब
रहा ऑनलाईन कनेक्ट..

आणि

वर्तमान माध्यम समूह टीम

आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.